महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक १४७७/रासेपू/९००७/१५ दिनांक :- २४ जून, २०२२

# -: प्रसिद्धीपत्रक :-

राज्यसेवा पूर्व परीक्षेतील पेपर क्रमांक दोन (CSAT) संदर्भात उमेदवारांनी केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने निर्णय घेण्यासाठी, तसेच राज्यसेवा मुख्य परीक्षेची परीक्षा योजना व अभ्यासक्रम यांचा एकत्रितपणे सर्वंकष अभ्यास करून शिफारशी करण्यासाठी खालील तज्ञांची त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात आली होती:-

(१) श्री. चंद्रकात दळवी, भा.प्र.से. (सेवानिवृत्त)- अध्यक्ष

(२) श्री. धनंजय कमलाकर - भा.पो.से. (सेवानिवृत्त-अतिरिक्त पोलीस महासंचालक) - सदस्य

(३) डॉ.एस. एफ. पाटील- माजी कुलगुरु- सदस्य

२. उपरोक्त समितीने त्यांना नेमून दिलेली कार्यकक्षा विचारात घेऊन त्यांचा अहवाल आयोगास सादर केला आहे. सदर अहवाल आयोगाने स्वीकृत केला आहे.

३. राज्य सेवा पूर्व परीक्षेतील पेपर क्रमांक २ (CSAT) अर्हताकारी करण्यासंदर्भात आयोगाच्या दिनांक २ मे, २०२२ रोजीच्या घोषणेद्वारे सर्व संबंधितांना अवगत करण्यात आले असून सदर निर्णयाची अंमलबजावणी दिनांक २१ ऑगस्ट, २०२२ रोजी होणाऱ्या राज्यसेवा पूर्व परीक्षा २०२२ पासून करण्यात येत आहे.

४. राज्यसेवा मुख्य परीक्षेच्या परीक्षा योजना व अभ्यासक्रमाबाबत आयोगाकडून खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे :-

**(एक)-परीक्षा योजना:-**

(१) परीक्षेचे स्वरुप :- वर्णनात्मक

(२) एकूण पेपर :- नऊ

(३) अर्हताकारी पेपर:-

| | | |
|---|---|---|
| (१) भाषा पेपर १ - मराठी | -- | ३०० गुण (२५% गुणांसह अर्हताकारी) |
| (२) भाषा पेपर २ - इंग्रजी | -- | ३०० गुण (२५% गुणांसह अर्हताकारी) |

(४) गुणवत्ता यादीकरिता विचारात घ्यावयाचे पेपर व त्यांचेगुण:-

| | | |
|---|---|---|
| (१) निबंध (मराठी किंवा इंग्रजी माध्यम) | -- | २५० गुण |
| (२) सामान्य अध्ययन -१ | -- | २५० गुण |
| (३) सामान्य अध्ययन-२ | -- | २५० गुण |
| (४) सामान्य अध्ययन-३ | -- | २५० गुण |
| (५) सामान्य अध्ययन -४ | -- | २५० गुण |
| (६) वैकल्पिक विषय पेपर क्रमांक १ | -- | २५० गुण |
| (७) वैकल्पिक विषय पेपर क्रमांक २ | -- | २५० गुण |
| एकूण गुण | -- | १७५० गुण |
| (५) मुलाखत | -- | २७५ गुण |
| एकूण गुण | -- | २०२५ गुण |